**ठळक बातम्या**

- तीन दिवसांचा इंडोनेशिया दौरा आटोपून प्रधानमंत्री मेलबोर्नला रवाना/ योग्यकर्तामधल्या प्रंबनन मंदिराला दिली भेट

- नवी मुंबई विमानतळामार्गे औषधांची आयात करायला केंद्र सरकारची परवानगी

- डान्सबार नियमन विधेयक आणि सावकारी सुधारणा विधेयक महाराष्ट्राच्या विधानसभेत मंजूर

- देशाच्या विविध भागात पावसाचा जोर/ महाराष्ट्रातल्या स्थितीबद्दल केंद्रीय गृहमंत्र्यांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा

**आणि**

- अमेरिकेच्या हल्ल्यांना इराणकडून प्रत्युत्तर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज इंडोनेशियातल्या योग्यकर्ता इथं ऐतिहासिक प्रंबनन मंदिर संकुलाला भेट दिली. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रोबोवो सुबियांतो त्यांच्यासोबत होते. या प्राचीन शिवमंदिर परिसरात लहान मोठी २२४ मंदिरं आहेत. त्यातली सुमारे २०० मंदिरं भग्नावस्थेत आहेत. युनेस्कोचं जागतिक वारसास्थळ प्रंबनन मंदिराच्या पुनरुज्जीवनाचं काम भारताच्या सहकार्यानं सुरु होणार आहे. प्रंबनन मंदिर संकुलाची सहल आध्यात्मिक आनंद देणारी आणि संस्मरणीय ठरली असं प्रधानमंत्री या भेटीनंतर जारी केलेल्या संयुक्त निवेदनात म्हणाले आहेत.

**- - - होल्ड- बाईट-- - -**

प्रधानमंत्री या भेटीनंतर इंडोनेशियाचा निरोप घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ऑस्ट्रेलियासाठी रवाना झाले.

तीन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात आज प्रधानमंत्री ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथं पोहोचतील. तीन दिवसांच्या या दौऱ्यात ते ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्याबरोबर भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होणार असून, 'भारत-

ऑस्ट्रेलिया सीईओ फोरम'मध्येही सहभागी होणार आहेत. तसंच भारतीय समुदायाशीही ते संवाद साधतील.

<><><><><>

आसियान-भारतादरम्यान व्यापार कराराच्या पुनरावलोकनाची प्रकिया पुढे नेण्यासाठी नवी दिल्ली इथे तेराव्या 'आसियान-भारत वस्तु व्यापार करार संयुक्त समिती'च्या बैठकीच आयोजन होत आहे. ही बैठक भारत आणि आसियान यांच्यातलं सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी, परस्पर सामंजस्य वाढवण्यासाठी आणि रचनात्मक संवाद पुढे नेण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरत असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

औषधांची आयात नवी मुंबई विमानतळामार्गे करायला केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. त्याकरता औषध नियम १९४५ च्या नियम ४३ ए मधे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं आवश्यक सुधारणा केल्या आहेत. याबरोबरच औषधांच्या आयातीसाठी केलेल्या सूचीतल्या स्थानांची संख्या ४२ झाली आहे.

<><><><><>

मुंबई शहरात २०२५-२६ या एका वर्षात ८५५ झाडं पडल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानसभेत दिली. या भागातल्या सर्व झाडांचं जोखीम मूल्यांकन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने एका वृक्षतज्ञ कंपनीची नियुक्ती केली असून वांद्रे भागात ५ हजार झाडांवर प्रायोगिक तत्त्वावर त्यांचं काम सुरू आहे. या संस्थेचा अहवाल ६ महिन्यांत मिळाल्यानंतर त्यानुसार इतर ठिकाणी उपाययोजना करू, असं आश्वासन त्यांनी दिलं. याशिवाय, या सर्व कामावर लक्ष ठेवणं, आयत्या वेळी उपाययोजना करण्यासाठी एक समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असंही त्यांनी सांगितलं. महानगरपालिकेच्या उद्यान विभागात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याचे निर्देश संबंधितांना दिले जातील, असंही मिसाळ म्हणाल्या.

दरम्यान, राज्यामध्ये ऑर्केस्ट्रा आणि करमणूक परवाना घेऊन त्या नावाखाली चालणाऱ्या डान्सबारना आळा घालण्यासाठी कायद्यात सुधारणा करणारे विधेयक काल विधानसभेत मंजूर करण्यात आलं. तसंच, राज्यात खाजगी सावकारांना आळा घालण्यासाठी आणि त्यातून

होणारी शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी सावकारी सुधारणा विधेयकही काल विधानसभेत मंजूर करण्यात आलं.

<><><><><>

मुंबईत जेजे आणि केईएम रुग्णालयात २-३ मशीनद्वारे, चिरफाड न करता शवविच्छेदन प्रक्रिया सुरू होईल. ही प्रक्रिया यशस्वी झाली तर राज्यात सर्वत्र मशीनच्या माध्यमातून शवविच्छेदन सुरू करू अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ९० टक्के प्रकरणांमध्ये मशीनद्वारे आणि १० टक्के गंभीर प्रकरणात पारंपरिक आणि मशीन अशा दोन्ही प्रकारे शवविच्छेदन करता येईल, असं ते म्हणाले. शवविच्छेदकांची रिक्त पदं भरण्याची प्रक्रिया लवकर पूर्ण करू असं आश्वासन पण त्यांनी दिलं.

येत्या १० वर्षात राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बस इलेक्ट्रिक करणार आहोत. हे काम पूर्ण झाल्यावर अशा प्रकारे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत पूर्णपणे इलेक्ट्रिक बसचा वापर करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असेल अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ५ हजार १५० बस भाड्याने घेण्याचे कंत्राट महामंडळाने दिले आहे. त्यातल्या ९०७ बस वापरत असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यात कुठल्याही भागात पुरवण्यासाठी एसटी बस देण्याची महामंडळाची तयारी असल्याचे ते म्हणाले. एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२६ दरम्यान ४ हजार २८१ अपघात झाले. याप्रकरणी नियमानुसार चालकांवर नियमानुसार कारवाई केल्याची माहिती त्यांनी लेखी उत्तरात दिली. आतापर्यंत ६७ लाख नागरिकांनी एन सी एम सी कार्ड काढल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्रात राजधानी मुंबईत पावसानं काहीशी उसंत घेतली असली तरी नाशिक आणि पालघर जिल्ह्यात अद्याप पावसाचा जोर कायम आहे. ठिकठिकाणची धरणं संततधार पावसामुळे भरुन वाहू लागली आहेत. मुंबई शहराला पाणीपुरवठा करणारे विहार आणि तुळशी तलाव भरुन वाहू लागल्याचं मुंबई महानगरपालिकेनं सांगितलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी राज्यातल्या पावसाच्या स्थितीबद्दल चर्चा केली. केंद्राकडून सर्वतोपरी मदत मिळेल असं आश्वासन शहा यांनी मुख्यमंत्र्यांना दिलं.

<><><><>

भारतीय हवामान विभागाने येत्या २ ते ३ दिवसांत अरबी समुद्राचा उत्तर भाग, राजस्थान, हरियाणा आणि पंजाबच्या उर्वरित भागांमध्ये मान्सून सक्रीय होण्याची शक्यता वर्तवली आहे. पश्चिम बंगाल, सिक्कीम, महाराष्ट्र, कर्नाटक किनारपट्टी, पूर्व राजस्थान, गुजरात, कोकण ,गोवा,दक्षिण कर्नाटकमध्ये  आज अतिवृष्टी होण्याची शक्यचा आहे. तसंच दिल्ली, हरियाणा, चंदीगढ, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, लडाख आणि ईशान्य भारतातल्या काही भागांमध्येही जोरदार पावसाची शक्यता आहे. गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि तेलंगणामध्ये वादळी वाऱ्यांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. आंध्रप्रदेश, लक्षद्वीप, अंदमान आणि निकोबार बेट, बिहार, ओदिशा, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

<><><><>

देशाच्या विविध भागात जोरदार पाऊस होत आहे. लदाखच्या सर्व जिल्ह्यांमधे हलक्या सरी येत असून हिमवृष्टीही होत आहे. त्यामुळे दृष्यमानता कमी झाली असून विविध खिंडीतली वाहतूक बंद झाली आहे. हवामानविभागानं जोरदार पावसामुळे पूरस्थिती उद्भवण्याचा इशारा दिला आहे.

हिमाचल प्रदेशातही सर्वत्र जोरदार पाऊस होत असून  कुल्लुमधे ढगफुटी झाली आहे. पर्यटकांनी नदी नाल्यांच्या आसपास फिरायला जाऊ नये असा सल्ला प्रशासनानं दिला आहे.

<><><><>

इराणच्या हॉर्मोजगन प्रांत आणि माशेहेर शहरावर अमेरिकेच्या सैन्यदलानं केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणनं अमेरिकेच्या ८५ सैन्यतळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोननं हल्ले चढवले. यातील दोन सैन्यतळ  बहारीन आणि कुवैत मध्ये आहेत.

<><><><>

शारजाहहून कराचीकडे जाणारं एक मालवाहू विमान काल रात्री उशिरा अरबी समुद्रावर बेपत्ता झालं. के२ एअरवेज कंपनीचं बोईंग प्रकारातलं हे विमान पाकिस्तानच्या हवाई हद्दीत

प्रवेश करण्यापूर्वी ३०० किलोमीटर अतंरावर असताना रडारवरून नाहीसं झालं. वैमानिकाने उड्डाणादरम्यान तांत्रिक बिघाड झाल्याची सूचना हवाई वाहतूक नियंत्रकाला दिली होती आणि प्रादेशिक नियंत्रण केंद्राकडे मदतीची विनंतीही केली होती. मात्र, काही वेळातच विमानाचा संपर्क तुटला. या विमानात पाच कर्मचारी होते.

<><><><><>

अमरनाथ यात्रेसाठी आज ९ हजार ८३७ तीर्थयात्री जम्मूहून कडक सुरक्षा व्यवस्थेत रवाना झाले. ४ हजार ४८० यात्री १७३ गाड्यांमध्ये मध्य काश्मीरच्या गांदरबल जिल्ह्यातल्या बालटालसाठी आणि अनंतनाग जिल्ह्यातल्या पहलगाम मार्गासाठी ५ हजार ३५४ तीर्थयात्री १८८ गाड्यांमधून रवाना झाले आहेत. आतापर्यंत १ लाख १५ हजार यात्रेकरूंनी ३ हजार ८८० मीटर उंचावर असलेल्या महादेवांच्या हिमलिंगाचं दर्शन घेतलं. ही यात्रा ५७ दिवसांची असून येत्या २८ ऑगस्ट रोजी पूर्ण होईल.

<><><><><>

जम्मू-काश्मीर इथल्या शोपियान जिल्ह्यातल्या चनापोरा परिसरामध्ये सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला असल्याची माहिती पोलीसांनी दिली आहे. ही मोहीम लष्कर आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाने एकत्रितरित्या राबवली होती.

<><><><><>

आपण आपल्या जमिनी स्वार्थासाठी बळकावल्यामुळे मुंबई शहरात पावसाळ्यात पाणी साचतं. अनधिकृत बांधकामं, तुंबलेली गटारे आणि सार्वजनिक सुविधांचा गैरवापरांमुळे ही परिस्थिती ओढावली असून ती आपलीच निर्मिती असल्याचे ताशेरे मुंबई उच्च न्यायालयाने ओढले आहेत. ऐन पावसाळ्यात मुंबईत पाणी साचण्याच्या समस्येसाठी केवळ महापालिकेला दोष देणं नागरिकांनी थांबवायला हवं, असंही न्यायालयाने म्हटलं.

//<><><><><>//